06 MAR 2025 पुढारी

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीमध्ये महिलांचे योगदान मोलाचे : डॉ. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीत महिला शिक्षकांसह प्रशासकीय सेविकांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. विद्यापीठामधील महिला उच्च नितीमूल्यांनिशी कार्यरत असून सर्व घटकांना न्याय प्रदान करण्यातही त्या आघाडीवर आहेत, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे केले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, विद्यापीठ अंतर्गत तक्रार समिती, महिला वसतिगृह, विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिलांचे उच्च शिक्षणातील शैक्षणिक आणि प्रशासकीय योगदान' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळेचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. शेजारी डॉ. विलास शिंदे, डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा गुळवणी. (छाया : पप्पू अत्तार)**

डॉ. शिर्के म्हणाले, मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत समाजाची दृष्टी वेगाने बदलत आहे. त्यांच्या शिक्षणास मदत करण्याकरिता अनेक घटक पुढे येत आहेत. परिणामी विद्यापीठात नवीन विद्यार्थिनी वसतिगृह आणि अभ्यासिका निर्माण झाली. विविध प्रकारच्या जबाबदाऱ्यांचे ओझे आणि सामोऱ्या येणाऱ्या अनंत अडचणींना तोंड देत महिला अग्रक्रमाने पुढे जात आहेत, याचा अभिमान वाटतो.

कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांनी महात्मा फुले यांनी महिलांच्या शिक्षणामध्ये मोठे योगदान दिले. भारतामध्ये स्त्रियांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी अनेक प्रयत्न झाले असे सांगितले. अधिष्ठता डॉ. मेघा गुळवणी म्हणाल्या, घर जबाबदारीने सांभाळणाऱ्या स्त्रियांनाही माणूस म्हणून बरोबरीचा अधिकार आणि सन्मान मिळणे आवश्यक आहे. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. भारती पाटील यांनीही मार्गदर्शन केले. स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ.निशा मुडे- पवार यांनी स्वागत केले.डॉ.प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. प्राजक्ता शहा यांनी सूत्रसंचलन केले. महिला वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार, डॉ. ज्योती जाधव, यांच्यासह शिक्षिका व कर्मचारी उपस्थित होते.

06 MAR 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**कोल्हापूर** : आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेस उपस्थित महिला शिक्षक, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी.

# विद्यापीठाच्या वाटचालीत महिलांचे योगदान महत्त्वाचे : कुलगुरू डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. ५ : 'शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीत महिला शिक्षकांसह प्रशासकीय सेविकांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. विद्यापीठामधील महिला उच्च नितीमूल्यांनिशी कार्यरत असून, सर्व घटकांना न्याय प्रदान करण्यातही त्या आघाडीवर आहेत', असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, विद्यापीठअंतर्गत तक्रार समिती, महिला वसतिगृह, विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित 'महिलांचे उच्च शिक्षणातील शैक्षणिक आणि प्रशासकीय योगदान' या विषयावर कार्यशाळा झाली. त्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'गुणात्मक आणि संख्यात्मक दृष्टीने विद्यापीठात विद्यार्थिनींची मोठी वाढ झाली आहे. विविध प्रकारांच्या जबाबदाऱ्यांचे ओझे आणि सामोऱ्या येणाऱ्या अनंत अडचणींना तोंड देत महिला अग्रक्रमाने पुढे जात आहेत, याचा अभिमान वाटतो.' कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. मेघा गुळवणी यांचेही भाषण झाले. कार्यशाळेत वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्राजक्ता शहा यांनी सूत्रसंचलन केले. डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत केले. यावेळी डॉ. ज्योती जाधव, माधुरी वाळवेकर, प्रतिमा पवार, तृप्ती करेकट्टी उपस्थित होते. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

06 MAR 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या वाटचालीत महिलांचे योगदान महत्त्वाचे

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीत महिला शिक्षकांसह प्रशासकीय सेविकांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. विद्यापीठामधील महिला उच्च नीतीमूल्यांनिशी कार्यरत असून सर्व घटकांना न्याय प्रदान करण्यातही त्या आघाडीवर आहेत, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, विद्यापीठ अंतर्गत तक्रार समिती, महिला वसतिगृह, विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिलांचे उच्च शिक्षणातील शैक्षणिक आणि प्रशासकीय योगदान" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.



कोल्हापूर : महिला दिनाच्यानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेस उपस्थित महिला शिक्षक, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत समाजाची दृष्टी वेगाने बदलत आहे. गुणात्मक आणि संख्यात्मक दृष्टीने विद्यापीठात विद्यार्थिनींची मोठी वाढ झाली आहे, ही स्तुत्य बाब आहे. विविध अडचणींना तोंड देत महिला अग्रक्रमाने पुढे जात आहेत, याचा अभिमान वाटतो.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, भारतामध्ये स्त्रियांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रत्येक व्यक्तीला समतेची, एकतेची वागणूक देण्याचे धोरण होते. तेच धोरण स्वीकारून महात्मा जोतीराव फुले यांनी महिलांच्या शिक्षणामध्ये मोठे योगदान दिले. अधिष्ठाता डॉ. मेघा गुळवणी म्हणाल्या, घर जबाबदारीने सांभाळणाऱ्या स्त्रियांनाही माणूस म्हणून बरोबरीचा अधिकार आणि सन्मान मिळणे आवश्यक आहे. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. भारती पाटील यांनीही मार्गदर्शन केले.स्त्रीअभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. निशा मुडे- पवार यांनी स्वागत केले. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. प्राजक्ता शहा यांनी सूत्रसंचलन केले. यावेळी डॉ. तानाजी चौगुले, महिला वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. ज्योती जाधव, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. विनिता रानडे, संध्या अडसूळे आदी उपस्थित होत्या.

06 MAR 2025 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा गांधींच्या छायेतही स्वत्व टिकविण्यात कस्तुरबांचे मोठेपण

## सोनाली नवांगूळ : पद्माराजे स्मृती व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महात्मा गांधी यांच्यासारख्या महान नेत्याच्या बरोबरीने धावताना स्वतःची फरपट न होऊ देता स्वत्व टिकविण्यामध्ये कस्तुरबा गांधी यांचे मोठेपण आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका, अनुवादक सोनाली नवांगूळ यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचे शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि गांधी अभ्यास केंद्र यांच्या वतीने आयोजित पद्माराजे स्मृती व्याख्यानमालेत 'कस्तुरबा उमजून येताना' या विषयावर त्या बोलत होत्या. डॉ. दशरथ पारेकर अध्यक्षस्थानी होते. डॉ. प्रकाश पवार प्रमुख उपस्थित होते.

सोनाली नवांगूळ यांनी तुषार गांधी यांचे 'दि लॉस्ट डायरी ऑफ कस्तुर: माय बा' हे पुस्तक अनुवादित केले आहे. या अनुवादाच्या निमित्ताने नव्याने उमगलेल्या कस्तुरबा गांधी यांच्याविषयी अत्यंत आपुलकीच्या भावनेतून मांडणी केली. त्याचप्रमाणे राष्ट्रपित्याच्या छायेखाली जगाने झाकोळून टाकलेल्या त्यांच्या स्वयंपूर्ण व्यक्तिमत्त्वावर त्यांनी प्रकाशझोत टाकला. कस्तुरबा गांधी यांना लिहिता येत होते, याची साधी नोंदही जगाने दोन वर्षांपूर्वीपर्यंत घेतली नाही, याची खंत व्यक्त करीत कस्तुरबांनी त्यांच्या डायरीमध्ये केलेल्या नोंदींची वैशिष्ट्ये, त्यामधून उलगडलेल्या कस्तुरबांविषयी माहिती दिली. डॉ. पारेकर म्हणाले, महात्मा गांधींविषयी अनेकांनी लेखन, आकलन करवून घेण्याचा मोह जगभरातील विचारवंतांना आवरत नाही. मात्र, याच विचारवंतांकडून कस्तुरबांवर मात्र कळत नकळतपणे अन्याय झालेला आहे. डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. सुरेश शिपूरकर, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. जयश्री कांबळे उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात पद्माराजे स्मृती व्याख्यानमालेत सोनाली नवांगूळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. नेहा वाडेकर, डॉ. प्रकाश पवार, डॉ. दशरथ पारेकर आणि डॉ. भारती पाटील उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAR 2025

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पद्माराजे स्मृती व्याख्यानमालेत बोलताना लेखिका सोनाली नवांगूळ. यावेळी डावीकडून डॉ. नेहा वाडेकर, प्रकाश पवार, दशरथ पारेकर, भारती पाटील उपस्थित होत्या.

# स्वत्व टिकविण्यात कस्तुरबा यांचे मोठेपण

## सोनाली नवांगूळ : विद्यापीठात पद्माराजे स्मृती व्याख्यानमाला

कोल्हापूर, ता. ५ : 'महात्मा गांधी यांच्यासारख्या महान नेत्याच्या बरोबरीने धावताना स्वतःची फरफट न होऊ देता स्वत्व टिकविण्यामध्ये कस्तुरबा गांधी यांचे मोठेपण आहे. त्या केवळ महात्म्याची सावली नव्हत्या, तर त्यांच्या स्वतःच्या काही अंगभूत क्षमता होत्या. त्या क्षमतांनिशी त्या महात्म्याच्या बरोबरीने उभ्या राहिल्या. आजच्या प्रत्येक महिलेला कस्तुरबांच्या संघर्षाशी आपले नाते जोडता येते', असे प्रतिपादन लेखिका आणि अनुवादक सोनाली नवांगूळ यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि गांधी अभ्यास केंद्रातर्फे आयोजित पद्माराजे स्मृती व्याख्यानमालेत 'कस्तुरबा उमजून येताना' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार डॉ. दशरथ पारेकर होते. डॉ. प्रकाश पवार प्रमुख उपस्थित होते.

नवांगूळ यांनी तुषार गांधी यांचे 'दि लॉस्ट डायरी ऑफ कस्तुरबा' हे पुस्तक अनुवादित केले आहे. कस्तुरबा गांधी यांना लिहिता येत होते, याची साधी नोंदही जगाने दोन वर्षांपूर्वीपर्यंत घेतली नाही, याची खंत व्यक्त करीत कस्तुरबांनी त्यांच्या डायरीमध्ये केलेल्या नोंदींची वैशिष्ट्ये आणि त्यामधून उलगडलेल्या कस्तुरबांविषयी नवांगूळ यांनी माहिती दिली. डॉ. पारेकर म्हणाले, 'गृहिणी ते गांधींच्या सत्याग्रहात सहभागी होणाऱ्या पहिल्या महिला सत्याग्रही, ही कस्तुरबांची वाटचाल विलक्षणआहे.' यावेळी डॉ. सुरेश शिपूरकर, रवींद्र भणगे, सुखदेव उंदरे, जयश्री कांबळे उपस्थित होते. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्तविक केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAR 2025

सकाळ

# डॉ. पी. सी. शेजवलकर पुरस्काराने प्रा. श्रीकृष्ण महाजन यांचा सन्मान

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना महाराष्ट्र कॉमर्स टीचर्स असोसिएशनने डॉ. पी. सी. शेजवलकर पुरस्कार देऊन सन्मानित केले. लातूर येथे नुकत्याच झालेल्या ३५ व्या महाराष्ट्र वाणिज्य परिषदेत असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवडे आणि डॉ. टी. ए. शिवारे यांच्या हस्ते वितरण झाले.

प्रा. महाजन यांनी उच्चशिक्षण क्षेत्रात वाणिज्य व व्यवस्थापन विषयाचे जे अध्ययन, अध्यापन, संशोधन व विस्तारकार्य केले आहे. त्याबद्दल त्यांना गौरविले. प्रा. महाजन यांनी अकौंटन्सी व फायनान्स या विषयांचे २९ वर्षे अध्यापन केले, तर अकौंटन्सी, फायनान्स, उद्योजकता विकास, काजू प्रक्रिया व अन्न प्रक्रिया उद्योग, ग्रामीण व्यवस्थापन या विषयांवर संशोधन केले आहे. सध्या ते विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आहेत. विद्यापीठाने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविले आहे.



कोल्हापूर : प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना लातूर येथे डॉ. बबनराव तायवडे, टी. ए. शिवारे यांच्या हस्ते डॉ. पी. सी. शेजवलकर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

06 MAR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एमबीए - रसायनशास्त्र' विभागात आज अंतिम लढत

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात आज पुरुष गटात एमबीए अधिविभाग विरुद्ध रसायनशास्त्र अधिविभाग यांच्यात अंतिम क्रिकेट सामना रंगणार आहे.

आज झालेल्या उपांत्य लढतीत एम.बी.ए. विभागाने क्रीडा अधिविभागाचा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला, तर रसायनशास्त्र विभागाने यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. आज या दोन संघांत अंतिम लढत रंगणार आहे. क्रीडा अधिविभाग व वाय.सी.एस.आर.डी. यांच्यात तिसऱ्या क्रमांकासाठी लढत होणार आहे.

महिलांच्या क्रिकेट स्पर्धेत गणित अधिविभाग, अर्थशास्त्र, नॅनो सायन्स, तंत्रज्ञान, प्राणीशास्त्र अधिविभागांनी पुढील फेरीत प्रवेश केला.

आज सकाळच्या सत्रात झालेल्या विविध मैदानी स्पर्धेचा निकाल असा : ४ बाय १०० रिले (महिला) - क्रीडा विभाग, तंत्रज्ञान अधिविभाग आणि भौतिकशास्त्र अधिविभाग.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवांतर्गत व्हॉलीबॉल व महिला कबड्डी स्पर्धेतील क्षण.

## शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

४०० मीटर (महिला) - मनीषा शिंदे (क्रीडा विभाग), अनुष्का भोसले (तंत्रज्ञान विभाग), अनुष्का पाटील (क्रीडा अधिविभाग), तर पुरुषांमध्ये प्रेम संकपाळ (तंत्रज्ञान विभाग), पार्थ कांबळे (क्रीडा विभाग), रोहित बिराजदार (जैवतंत्रज्ञान विभाग).

लांब उडीत पुरुषांत आर्यन शेजाळ (क्रीडा विभाग), साहिल शिकलगार (रसायनशास्त्र विभाग), शुभम कांबळे (क्रीडा विभाग).

बास्केटबॉल स्पर्धेत अर्थशास्त्र आणि क्रीडा विभाग या संघांनी पुढील फेरीत प्रवेश केला. महिला गटात अर्थशास्त्र विभागाने पुढील फेरीत प्रवेश केला. कबड्डीत क्रीडा विभाग, ए.जी.पी.एम. विभाग, वायसीएसआरडी विभाग आणि इतिहास विभाग उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले. महिलांमध्ये क्रीडा विभाग, कॉम्प्युटर सायन्स, तंत्रज्ञान विभाग, गणित विभाग उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले. व्हॉलीबॉल पुरुषांमध्ये तंत्रज्ञान विभाग, लायब्ररी सायन्स, एजीपीएम विभाग, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले.

### आज महोत्सवात

क्रिकेट, कबड्डी, रस्सीखेच, बास्केटबॉल, अॅथलेटिक्स (महिला व पुरुष) यांचे पुढील फेरीतील सामने रंगणार आहेत.

06 MAR 2025 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवस्पंदन क्रीडा स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाची चमकदार कामगिरी

- शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव



कोल्हापूर : शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात संगणकशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान अधिविभागांच्या विद्यार्थ्यांमधील बॅडमिंटन सामन्यातील एक क्षण.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवात गतवर्षीप्रमाणेच यंदाही तंत्रज्ञान अधिविभागाच्या क्रीडापटूंनी विविध स्पर्धांत चमक दाखविण्यास सुरुवात केली आहे.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभानंतर मंगळवारी बुद्धिबळासह बॅडमिंटन स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केले. अधिविभागाच्या धैर्यशील सरनोबतने बुद्धिबळ पुरूष गटात, तर प्रतीक्षा गोसावीने महिला गटात प्रथम क्रमांक मिळविला. बुद्धिबळ पुरुष गटात अर्थशास्त्र अधिविभागाच्या अभिजित खोपकरने द्वितीय व क्रीडा अधिविभागाच्या राहुल लोखंडेने तृतीय क्रमांक पटकाविला. महिला गटात समाजशास्त्राच्या स्नेहल खामकरने द्वितीय, तर गणितशास्त्रच्या गीता पांढरेने तृतीय क्रमांक मिळविला. पुरुष बॅडमिंटनचीही अंतिम फेरी आज झाली. यामध्ये तंत्रज्ञान अधिविभाग, अर्थशास्त्र अधिविभाग आणि जैव तंत्रज्ञान



**शिवाजी विद्यापीठातून**

अधिविभाग यांनी अनुक्रमे क्रमांक पटकावले. पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेत आज यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, एम.बी.ए., इतिहास, कॉम्प्युटर सायन्स, क्रीडा अधिविभाग, रसायनशास्त्र या अधिविभागांनी प्रतिस्पर्धी संघांवर विजय मिळवित पुढील फेरीत प्रवेश केला. तर महिला क्रिकेट स्पर्धेत यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, इतिहास, तंत्रज्ञान, भौतिकशास्त्र, पर्यावरणशास्त्र, नॅनो सायन्स, गणितशास्त्र, राज्यशास्त्र, प्राणीशास्त्र या अधिविभागांनी पुढील फेरीत प्रवेश केला. पुरुषांच्या कबड्डी स्पर्धेत इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, क्रीडा अधिविभाग, ए.जी.पी.एम., संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र या अधिविभागांनी पुढील फेरीत प्रवेश केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAR 2025
लोकमत

# राजकीय नेतृत्वावर सोमवारी परिसंवाद

**कोल्हापूर :** लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या वतीने १० मार्चला 'महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्व (१९६० ते १९८० )' या विषयावर एकदिवशीय परिसंवाद होणार आहे. मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी ११ वाजता होणाऱ्या या परिसंवादात ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर व प्रा. डॉ. अरुण भोसले सहभागी होणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 MAR 2025
लोकमत

# अर्जासाठी १६ मार्चपर्यंत मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग येथे बी.एस्सी. बीएड (आयटीईपी) या एकात्मिक चार वर्षांच्या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे. बारावी विज्ञान शाखा उत्तीर्ण किंवा ज्यांनी बारावी विज्ञान शाखेची आताच परीक्षा दिली आहे असे विद्यार्थी नॅशनल कॉमन एंट्रन्स टेस्ट अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात. या प्रवेश परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी १६ मार्चपर्यंत मुदत आहे. अधिक माहितीसाठी शिक्षणशास्त्र विभागास संपर्क साधावा, असे आवाहन विभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले.